# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

**विषय : पीएच.डी. अभ्यासक्रम 2022 प्रवेश प्रक्रिया द्वितीय फेरी**

**संदर्भ : 1. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. 42/2023 दिनांक: 20/03/2023**
**2. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. 43/2023 दिनांक: 21/03/2023**

पीएच.डी. अभ्यासक्रम 2022 च्या पहिल्या फेरीतील पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी भरलेल्या जागा विचारात घेऊन उर्वरित रिक्त जागा भरण्यासाठी तसेच नव्याने मिळालेल्या मान्यताप्राप्त पीएच.डी. मार्गदर्शकांना व पदोन्नतीने प्रवेशासाठी वाढलेल्या अधिकच्या जागा भरण्यासाठी दुसऱ्या प्रवेश फेरीचे आयोजन करण्यात आले असून उपरोक्त संदर्भिय परिपत्रकांद्वारे संशोधक मार्गदर्शक, संशोधन केंद्र व द्वितीय फेरीकरिता पात्र विद्यार्थ्यांसाठी सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या.

त्याअनुषंगाने मा. विभागप्रमुख, विद्यापीठ विभाग, मा. प्राचार्य सर्व संलग्नित मान्यताप्राप्त संशोधन संस्था, संशोधक मार्गदर्शक, पात्र विद्यार्थी यांना कळविण्यात येते की, संदर्भिय परिपत्रकात नमूद केलेल्या वेळापत्रकास खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे. सबब यापुढे कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**महत्वाच्या तारखा:**

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| 1. | संशोधक मार्गदर्शकांनी जागा अद्ययावत करणे | दिनांक: 21/03/2023 ते 04/04/2023 |
| 2. | मार्गदर्शकांनी अद्ययावत केलेल्या जागा संशोधन केंद्रांनी आरक्षणनिहाय निश्चित करणे. | दिनांक: 05/04/2023 ते 10/04/2023 |
| 3. | विद्यार्थ्यांनी आरक्षणनिहाय उपलब्ध रिक्त जागा विचारात घेऊन संशोधन केंद्र निवडणे/बदलणे. | दिनांक: 11/04/2023 ते 20/04/2023 |
| 4. | विद्यापीठाकडून संशोधन केंद्राना विद्यार्थ्यांनी निवडलेल्यानुसार याद्या पाठविणे. | दिनांक: 21/04/2023 ते 22/04/2023 |
| 5. | संशोधन केंद्रानी मुलाखतींचे आयोजन करून मुलाखत प्रक्रिया पूर्ण करणे. | दिनांक: 23/04/2023 ते 15/05/2023 |

ऑनलाईन संदर्भात तांत्रिक मदतीसाठी संपर्क:
Email: phdtracking_support@pun.unipune.ac.in
Phone: 020-71533633

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

संदर्भ: शै.प्रवेश/ 1512
दिनांक: 27/03/2023

**प्रत:**

1. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
2. मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/ संशोधन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील /संशोधन केंद्रातील सर्व संशोधन मार्गदर्शकांच्या निदर्शनास आणून उपरोक्त दिलेल्या सूचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी.

D:\PET 2022 Data ND\परिपत्रक पीएच डी new.docx